दै. सत्यप्रभा दि. 12/05/24

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्या

# आरोपीला ३ दिवसाची कोठडी

**भोकर, दि. ११–** ग्रामिण भागात रहाणाऱ्या एका अल्पवयीन मुलीस लग्नाचे आमिष दाखवून पळवून नेत अत्याचार करणाऱ्या आरोपीला येथील न्यायालयाने तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.

तालुक्यातील एका गावात राहणाऱ्या एका अल्पवयीन मुलीस आरोपी अर्जून संजय कदम वय २१ या तरुणाने लग्नाचे आमिष दाखवून दि. ४ मे रोजी नाळेश्वर येथे पळवून नेले व तिच्यावर शारीरिक अत्याचार केले. या प्रकरणी मुलीच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीवरुन आरोपी विरोधात भोकर पोलीसानी गुन्हा नोंद करून तपास केला व सहाय्यक पोलीस निरीक्षक शैलेंद्र औटे यांनी तत्काळ तपासाची चक्रे फिरवून आरोपीसह अल्पवयीन मुलीस शुक्रवार दि. १० मे रोजी आपल्या ताब्यात घेऊन चौकशी केली. मुलगी अल्पवयीन असल्याचे निष्पण झाल्याने आरोपीस शनिवार दि.११ मे रोजी न्यायालया पुढे हजर केले असता न्यायालयाने आरोपीस तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली असून आरोपी विरुद्ध गुरन १३५ अन्वये कलम ३६३, ३७६ पोस्को कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक सुभाषचंद्र मारकड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक शैलेंद्र औटे हे पुढील तपास करत आहेत.